# जिल्हा परिषद, सांगली

# आरोग्य विभाग.

# सांगली जिल्हा परिषद, आरोग्य विभाग

## संस्थेची रचना, कार्य व कर्तव्य

"प्रस्तावना"

सांगली जिल्हा परिषद, आरोग्य विभागाची स्थापना सन १ मे, १९६२ रोजी झाली आहे.

तत्पूर्वी जिल्हा लोकलबोर्डा अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग या नावाने सदरचा कार्यान्वीत होता. सन १९६२ मध्ये सदर कार्यालय जिल्हा परिषदच्या मुख्य इमारतीच्या आवारात करण्यात आले. आज पर्यंत हे कार्यालय कार्यान्वीत आहे.

सांगली जिल्हाची ग्रामीण विभागाची लोकसंख्या २३५२२८१ इतकी असून या लोकसंख्येस प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्य सुविधा पुरविण्याचे काम जिल्हा परिषदच्या आरोग्य विभागामार्फत केले जाते. त्यासाठी खालील प्रमाणे आरोग्य संस्था कार्यरत आहे.

- प्राथमिक आरोग्य केंद्र :- ७६
- प्राथमिक आरोग्य उपकेंद्र :- ३७२
- प्राथमिक आरोग्य पथके :- ०२
- आयुर्वेद दवाखाने :- १४

प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीत बाह्य रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग व्रणोपचार विभाग, शस्त्रक्रियागृह बाळतंपण खोली, औषध भांडार, अस्थापना विभाग, शवविच्छेदनगृह, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वाहन ठेवण्यासाठी खोली प्रतीक्षालय इ. खोल्या आहेत. या शिवाय कर्मचारी व अधिकारी यांचे निवासस्थांनाची सुविधा उपलब्ध आहे.

प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात आंतररुग्णाकरिता ६ खाटांची सुविधा बाळतपण, शस्त्रक्रिया, साथीच्या आजाराचे रुग्ण इत्यादी उपचार घेऊ शकतात.

प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राचे मुख्यालयी खालील प्रमाणे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मंजूर आहेत.

- वैद्यकीय अधिकारी वर्ग १ व २ :-१८
- परिचारिका प्रसाविका/स्त्री अभ्यांगता :-६५
- आरोग्य सहाय्यक पुरुष :-१००
- औषध निर्माण अधिकारी :-६४
- प्रयोग शाळा तंत्रज्ञ :-०२
- कनिष्ट लिपिक :-०७
- वाहन चालक :-०६
- परिचर :-०७
- सफाईगार :-००

**एकूण**

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्रास खालील कर्मचारी मंजूर आहेत

- सहाय्यक परिचारिका प्रसाविका -५७९
- बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी -३७९
- अर्धवेळ स्त्री परिचर -३६६

शासनाच्या निकषानुसार बिगर आदिवासी भागात ३० हजार लोकसंख्येस एक प्राथमिक आरोग्य केंद्र व त्या अंतर्गत प्रत्येक ५००० लोकसंख्येस एक प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची स्थापना करणेत आली आहे. तसेच आदिवासी भागाकरिता २० हजार लोकसंख्येस एक प्राथमिक आरोग्य केंद्र व ३ हजार लोकसंख्येस एक प्राथमिक आरोग्य उपकेंद्र स्थापना करण्यात आले आहे.

सांगली जिल्हयात ग्रामीण भागातील जनतेस खालील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत आरोग्य सेवा पुरविण्यात येते.

1. राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम
2. माता बाल संगोपन व शालेय आरोग्य कार्यक्रम
3. राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम
4. राष्ट्रीय सुधारित क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम
5. राष्ट्रीय कुष्ठरोग दुरीकरण कार्यक्रम
6. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम

या व्यतिरिक्त खालील कार्यक्रम जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत राबविले जातात.

7. साथरोग नियंत्रण कार्यक्रम
8. मृत्युच्या कारणांचे सर्वेक्षण
9. एड्स नियंत्रण कार्यक्रम
10. जिल्हा आरोग्य माहिती व विस्तार

या शिवाय प्रासंगिक कार्यक्रम उदा. पल्स पोलिओ, लसीकरण मोहीम, कौटुंबिक जन जनजागृती या प्रमाणे विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते.

या सर्व आरोग्य कार्यक्रमाची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रमाणे अधिकार व कर्मचारी यांची पदे मंजूर आहेत.

अ) जिल्हास्तर-

१) जिल्हा आरोग्य अधिकारी वर्ग १ -

२) अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी वर्ग १ -

३) जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी वर्ग १ -

४) प्रशासन अधिकारी वर्ग २ -

५) सांख्यिकी अधिकारी वर्ग २ -

६) तालुका आरोग्य अधिकारी वर्ग २-

७) वैद्यकीय अधिकारी वर्ग -२

८) विस्तार अधिकारी (आ) आरोग्य पर्यवेक्षक -

९) जिल्हा जनस्वास्थ परिचारिका -

१०) आरोग्य सहाय्यक (म) -

११) आरोग्य सहाय्यक (पु) -

१२) आरोग्य सेवक (पु) -

१३) आरोग्य सेवक (म) -

१४) औषध निर्माण अधिकारी-

१५) प्रयोगशाळा तंत्रज्ञ-

१६) शितयंत्र तंत्रज्ञ-

१७) अवैद्यकीय पर्यवेक्षक-

१८) कुष्ठरोग तंत्रज्ञ-

१९) सफाईगार-

२०) सांख्यिकी पर्यवेक्षक-

२१) विस्तार सांख्यिकी -

२२) सांख्यिकी अन्वेषक-

वरील आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे अधिनिस्त मा.संचालक, आरोग्य सेवा, अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण माताबाल संगोपन शालेय आरोग्य पुणे, सह संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य उपसंचालक, आरोग्य सेवा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आलेल्या सुचनाप्रमाणे करण्यात येते.

# अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्ये-

१) जिल्हा आरोग्य अधिकारी -

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे प्रमुख असतील, शासनाच्या आरोग्य विभागा कडील आदेशांना व मार्गदर्शक सुचनांना अधिन राहुन विभागातील सर्व अधिनिस्त अधिकारी व कर्मचारी यांचे कडून सर्व आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी व परिणाम कारक अंमलबजावणी करुन घेतील.यासाठी अधिका-यांवर जबाबदारी सोपवितील. जिल्हयातील वैद्यकिय अधिका-यांवर संपूर्ण कामकाजावर नियंत्रण ठेवतील व शिस्त व सक्षम व्यवस्थापन सातत्याने राखण्यासाठी जबाबदार असतील. प्राथमिक आरोग्य केंद्राना अचानक भेटी देवून कामकाजाची पाहणी व तपासणी करुन आढावा घेतील. दिलेल्या भेटीचा व केलेल्या कार्यवाहीचा तपासणी अहवाल आवश्यक वाटल्यास वरिष्ठ अधिका-यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करतील. जिल्हा आरोग्य कार्यालयातील विविध उपविभागांना भेटी देवून तपासणी करतील. जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावंर अधिकारी व कर्मचा-यांच्या आढावा बैठका घेवुन सुचना व मार्गदर्शन करतील.

२) अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी -(कुटूंब कल्याण)

संपूर्ण जिल्हयातील कुटूंब कल्याण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबाजवणी करण्यासाठी जबाबदार राहतील. त्यांना सुंपूर्त केलेल्या तालुक्यांमध्ये संपर्क अधिकारी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राना नियमित भेटी देवून तेथील कामकाजात सुधारणा घडवून आणतील. या तालुक्यांमधील वैद्यकिय अधिका-यांची कामाची तपासणी, दैनंदिनी मंजूरी किरकोळ रजा इत्यादी कामे पाहतील विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची उदिष्ट पुर्ती होणेसाठी शिबीरांचे / मोहिमांचे अभियांनांचे आयोजन करतील. या व्यतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या सुचनां प्रमाणे कामकाज करतील.

३) अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी -(साथरोग)

संपूर्ण जिल्हयातील साथरोग नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबाजवणी करण्यासाठी जबाबदार राहतील. त्यांना सुंपूर्त केलेल्या तालुक्यांमध्ये संपर्क अधिकारी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राना नियमित भेटी देवून तेथील कामकाजात सुधारणा घडवून आणतील.या तालुक्यांमधील वैद्यकिय अधिका-यांची कामाची तपासणी, दैनंदिनी मंजूरी किरकोळ रजा इत्यादी कामे पाहतील साथ उद्रेकांच्या ठिकाणी भेटी देवून साथ उदभवांची कारणमिकांसा जाणून घेवून आवश्यक त्या प्रतिबंधक उपाययोजनांची वैद्यकिय अधिका-या मार्फत तसेच विविध विभागांचे सहाकार्य घेवून प्रतिबंधात्मक उपाययोजना करतील. विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची उदिष्ट पुर्ती होणेसाठी शिबीरांचे / मोहिमांचे अभियांनांचे आयोजन करतील. या व्यतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या सुचनां प्रमाणे कामकाज करतील.गलगंड

नियंत्रण कार्यक्रम, आदर्श गांव योजना, नवसंजवनी योजना तक्रार निवारण कक्ष, ग्राहक संरक्षण कक्ष, विविध प्रयोजनार्थ नाहरकत प्रमाणपत्रे इत्यादी विभागाचे कामकाज पाहतील.

४) अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी -(मा.बा.स)

प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, लसीकरण कार्यक्रम, एकात्मीक बाल विकास कार्यक्रम, शालेय आरोग्य तपासणी, आश्रम शाळा तपासणी एएफपी सर्व्हेलंस पल्स पोलिओ लसीकरण, माता व बाल मृत्यू बाबत सर्वेक्षण व सनियंत्रण, शितसाखळी तपासणी, लससाठा मागणी व पुरवठा, लसीद्वारे टाळता येणारे आजारांचे सर्वेक्षण व सनियंत्रण आरोग्य सेवा सत्रांचे नियोजन व आयोजन लसीकरणांनंतरची गुंतागूंत इत्यादी कामकाजाची जबाबदारी पार पाडतील. त्यांना देण्यात आलेल्या तालुक्यांमधील प्राथमिक आरोग्य केंद्राना, पंचायत समित्यांना, उपकेंद्राना भेटी देवुन कामकाजाचा आढाव घेतील, मार्गदर्शक सुचना देतील. संबधीत तालुकयातील वैद्यकिय अधिकारी यांच्या कामकाजाची तपासणी करुनन दैनंदिनी व किरकोळ रजा मंजुर करतील.

५) प्रशासन अधिकारी-

आरोग्य विभागांच्या प्रशासकीय बार्बीचे प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी असतील. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणा खालील अस्थापनेचे वेतन व अन्य देयकांवर स्वाक्ष-या करतील.लेखापरिक्षण विभागाच्या विविध लेखापरिक्षण अहवाल व आक्षेपांना उत्तर देतील. जिल्हा आरोग्य कार्यालयाच्या सर्व प्रकारचा पत्रव्यवहार निकाली काढण्यास जबाबदार असतील. आरोग्य विभागाचा अर्थ संकल्प, अनुदान व होणा-या खर्चावर लक्ष ठेवतील. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या आदेशांचे पालन करतील.

६) जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

विविध राष्ट्रीय व इतर आरोग्य कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी सर्व स्तरावर माहिती शिक्षण व प्रसिद्धी या बाबत सुसंवाद साधुन समन्वय घडवतील. यासाठी लागणारे प्रचार साहित्य सामुग्री वेळोवेळी आवश्यकते नुसार विविध ठिकाणी उपलब्ध करुन देतील. विविध शिबीरांमध्ये आरोग्य शिक्षण साहीत्य प्रदर्शीत करतील. दृकश्राव्य साहीत्यांची मागणी पुरवठा व विनियोग या बाबत पाठपुरावा करतील. वृत्त पत्रातील विविध आरोग्य विषयक बातम्या तक्रारी, तक्रारी निवारणा बाबत संबधीतांना सुचना व पाठपुरावा हे कामकाज पाहतील. विविध मोहिमा अभियान शिबीरे या साठी प्रचार कार्य करतील. प्राथमिक आरोग्य केंद्राना आयईसी कार्यक्रमा बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार सुचना देतील. त्यांचे कामकाजाचा मासीक अहवाल वरिष्ठांना दरमहा सादर करतील.
जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करतील

७) सांख्यिकी अधिकारी वर्ग २

जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील जन्ममृत्यू बाबतचे उतारे या बाबतचा अहवाल दरमहा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने वरिष्ठांना सादर करतील. जिल्हयातील विविध दर उदा. जन्मदर, मृत्यूदर, अर्भकमृत्यूदर, माता मृत्यू, बालमृत्यूदर इत्यादी उपलब्ध करुन देतील. जिल्हयातील सर्व आरोग्य कार्यक्रमांचे माहिती व्यवस्थापन पद्धती अहवालांचे सनियंत्रण ठेवुन उदिष्टपुर्ती बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना माहिती सादर करतील.सांख्यकी पर्यवेक्षक, व सांख्यिकी अन्वेषक यांना मार्गदर्शक सुचना देतील व त्यांचे कामाचे पर्यवेक्षण करुन त्यांचे वर नियंत्रण ठेवतील. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करतील.

८) तालुका आरोग्य अधिकारी वर्ग २

तालुका आरोग्य अधिकारी हे तालुका आरोग्य विभागाचे प्रमुख असतील.तालुक्यतील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेद यांना अचानक भेटी देवून कामकाज पहाणे.तपासणी करुन आढावा घेणे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आवश्यक असल्यास वरिष्ठांना सादर करतील. प्रा आ केदातील आरोग्य कर्मचा.यांना १ ते ११ प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करणे.खाजगी रुग्णांलयांचे नोंदणी प्रस्ताव तपासून सादर करणे.

९) वैद्यकिय अधिकारी वर्ग १

प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत असणा-या गावांतील संपूर्ण लोकसंख्येस आरोग्य सुविधा स्वत व त्यांचे अधिनस्त असलेल्या कर्मचा-या मार्फत वेळोवेळी सातत्याने पुरवतील. प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रशासकीय व तांत्रीक बाबींवर नियंत्रण ठेवतील. वरिष्ठांकडुन प्राप्त झालेल्या आदेश व सुंचनांचे पालन करतील. प्राथमिक आरोग्य केंद्राचा परिसर व अंतर्गत स्वच्छता राखणे, पुर्णवेळ दवाखाना उघडा ठेवणे सर्पदंश, श्वानदंश वरील उपचार तत्परतेने करणे, तातडीच्या रुग्णांना वेळेत योग्य औषधोपचार करुन आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा देणे, अधिनिस्त कर्मचा-यांना मार्गदर्शन करुन त्यांचे कामात वृध्दी करुन घेणे, स्वतः मुख्यालयी राहणे, प्राथमिक आरोग्य केंद्, पंचायत समिती, जिल्हा कार्यालय येथे आढावा सभांसाठी हजर राहणे. उपचारार्थ लागणारा औषधी साठा इंजेक्शने गोळया मागणी करणे. प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सुरळीत व विना तक्रार चालविणे, इत्यादीची नियमित अंमलबजावणी करणे. ही वैद्यकिय अधिका-यांची जबाबदारी राहील. उपकेंद्राना व तेथील आरोग्य सेवा सत्रांना नियमित उपस्थीत राहुन लाभार्थीची तपासणी करणे. शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करणे. शिबीरांचे आयोजन करणे. मासीक कामकाजाचा आढावा घेवुन दप्तराची तपासणी करणे. एकत्रीत अहवाल वरिष्ठांना सादर करणे. विविध विभागांचा समन्वय साधुन आरोग्य कार्यक्रम जनमानसात माहित करुन देणे. साथग्रस्त भागात

प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना करणे. इत्यादी कर्तव्य वैद्यकिय अधिकारी यांचे राहतील.

१०) वैद्यकिय अधिकारी वर्ग २ -

प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत असणा-या गावांतील संपूर्ण लोकसंख्येस आरोग्य सुविधा स्वत व त्यांचे अधिनस्त असलेल्या कर्मचा-या मार्फत वेळोवेळी सातत्याने पुरवतील. प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रशासकीय व तांत्रीक बाबींवर नियंत्रण ठेवतील. वरिष्ठांकडुन प्राप्त झालेल्या आदेश व सुंचनांचे पालन करतील. प्राथमिक आरोग्य केंद्राचा परिसर व अंतर्गत स्वच्छता राखणे, पुर्णवेळ दवाखाना उघडा ठेवणे सर्पदंश, श्वानदंश वरील उपचार तत्परतेने करणे, तातडीच्या रुग्णांना वेळेत योग्य औषधोपचार करुन आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा देणे, अधिनिस्त कर्मचा-यांना मार्गदर्शन करुन त्यांचे कामात वृध्दी करुन घेणे, स्वतः मुख्यालयी राहणे, प्राथमिक आरोग्य केंद्, पंचायत समिती, जिल्हा कार्यालय येथे आढावा सभांसाठी हजर राहणे. उपचारार्थ लागणारा औषधी साठा इंजेक्शने गोळया मागणी करणे. प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सुरळीत व विना तक्रार चालविणे, इत्यादीची नियमित अंमलबजावणी करणे. ही वैद्यकिय अधिका-यांची जबाबदारी राहील. उपकेंद्राना व तेथील आरोग्य सेवा सत्रांना नियमित उपस्थीत राहुन लाभार्थीची तपासणी करणे. शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करणे. शिबीरांचे आयोजन करणे. मासीक कामकाजाचा आढावा घेवुन दप्तराची तपासणी करणे. एकत्रीत अहवाल वरिष्ठांना सादर करणे. विविध विभागांचा समन्वय साधुन आरोग्य कार्यक्रम जनमानसात माहित करुन देणे. साथग्रस्त भागात प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना करणे. इत्यादी कर्तव्य वैद्यकिय अधिकारी यांचे राहतील.

११) विस्तार अधिकारी (आ) आरोग्य पर्यवेक्षक -

विस्तार अधिकारी/आरोग्य पर्यवेक्षक, हे पद पंचायत समितीस्तरावर १९८० मध्ये निर्माण झाले आहे. तालुकास्तरावरुन कार्यक्षेत्रात राबविणेत येणा-या सर्व आरोग्य कार्यक्रमांचा आढावा घेतात व मार्गदर्शन करतात. त्यांच्या जबाबदा-या खालील प्रमाणे- सर्व आरोग्य कार्यक्रमाविषयी माहितीचे अहवाल व नोंदवहया संकलन करुन अदयावत ठेवणे. प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र यांचेशी समन्वय राखणे प्रशिक्षण कार्यात मदत करणे सर्व आरोग्य कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घेवून कार्यक्रमांचे नियोजन अंमलबजावणी, सनियंत्रण, मुल्यमापन तालुकास्तरावर ठेवणे. निरनिराळया विभागांचा व संस्थांचा सहभाग घेणे. पल्स पोलिओ, कुटुंब कल्याण, कौटुंबिक आरोग्य जागृती अभियान इत्यादी कामे यशस्वीपणे राबविणे. ग्राम पंचायत पातळीवर पाणी शुध्दीकरणाबाबत माहिती देवून मार्गदर्शन करणे, जन्म मृत्यु व इतर जिवणविषयक आकडेवारीची नोंद घेवून त्याचा उपयोग करून घेणे, अंगणवाडी, बालवाडी, ग्रामपंचायत भेटी देणे वरीष्ठांना अहवाल सादर करणे.

१२) आरोग्य सहाय्यक स्त्री -

ग्रामीण विभागामध्ये एकूण १५००० लोकसंख्येसाठी आणि आदिवासी भागामध्ये १०००० लोकसंख्येसाठी किमान ३ उपकेंद्र कार्यरत असून आरोग्य सहाय्यीकेला कामाचे पर्यवेक्षण आणि नियंत्रण करावे लागते. त्यांच्या जबाबदरा-या खालील प्रमाणे-

आरोग्य सेविकेला मार्गदर्शन करणे, कामाचे पर्यवेक्षण करणे, तिचे कौशल्य व ज्ञान वृध्दींगत करणे, उपकेंद्रांना भेटी देवून दैनंदिन कामाची पहाणी करणे, त्रुटींची पुर्तता करुन घेण्ये कामाची पडताळणी व अहवाल वरीष्ठांना सादर करणे, पर्यवेक्षिकीय क्षेत्र भेटी देणे, सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करणे, गर्भवती स्त्रीयांची व बालकांची आरोग्य सेवा सत्रात तपासणी करणे गटस्तरावरील सभांना उपस्थित राहाणे, धडक मोहिमांमध्ये सहभागी होणे, उपकेंद्रांतील औषधे व साहीत्य पुरवठा करण्यास मदत करणे, नोंदवही व अहवाल अदयावत ठेवणेसाठी मार्गदर्शन करणे. दायीचे प्रशिक्षण आयोजन करणे, वैदयकीय अधिका-यांना मदत करणे, सर्व आरोग्य कार्यक्रमांत सहभागी होउन कामाचा मासिक अहवाल वरीष्ठांना सादर करणे. वैदयकीय अधिकारी यांनी दिलेल्या संचनांचे पालन करणे.

१३) आरोग्य सहाय्यक पुरुष -

पुरुष आरोग्य सहाय्यकाने एकूण २०००० लोकसंख्येला सेवा देणे अपेक्षित आहे. ४ उपकेंद्राचे आरोग्य कर्मचारी पुरुष यांचे पर्यवेक्षण करणे बंधनकारक आहे. आरोग्य कर्मचा-याच्या कामाचे पर्यवेक्षण करुन मार्गदर्शन करणे त्यास लागणा-या साहीत्य सामुग्रीचे व्यवस्थापन करुन पुरवठा करणे. विविध पातळीवर सांघीककार्य हाती घेवुन सहभाग घेणे.आरोग्य कार्यक्रमाचे अहवाल व नोंदी ठेवुन वैद्यकिय अधिकारी यांना सादर करणे. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम - हिवताप प्रतिरोध, साथरोग नियंत्रण अंधत्व निवाराण, कुष्ठरोग, क्षयरोग, प्रजनन व बाल आरोग्य, क्षारसंजीवनी उपचार शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण आरोग्य शिक्षण, लैगीक शिक्षण, जीवन विषयक आकडेवारी, परिसर स्वच्छता, आयोडीन न्यूनता विकार कार्यक्रम अंगणवाडी भेट इत्यादी कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घेवुन कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.

१४)आरोग्य सेवक पुरुष

प्रत्येक ५००० लोकसंख्ये करीता एक उपकेंद्र व तेथे एक आरोग्य सेवक व एक आरोग्य सेवीका नियुक्त करुन त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरी १५ दिवसात एक भेट देणे आवश्यक आहे. हिवताप प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत रक्त नमुने घेवुन गृहीत उपचार देणे, किटकनाशकांची फवारणी देखरेख डासोत्पती स्थाने शोधुन गप्पी मासे सोडणे, साथरोग नियंत्रणांतर्गत रुग्ण सर्वेक्षण, रोगप्रतिबंधक उपाययोजना करणे, पाणी, टीसीएल, थुकी, मीठ नमुने नियमितपणे तपासणीस पाठविणे. संक्षयीत कुष्ठरोगी / क्षयरोगी शोधणे व उपचाराखाली आणने. परिसर स्वच्छता अंतर्गत शौष

खड्डा, परसबाग, सुरक्षीत संडास पाणी शुद्धीकरणाची खात्री करणे, इत्यादी बाबत ग्रामपंचायतीस पाठपुरावा करणे. कार्यक्षेत्रातील जन्ममृत्यू विवाह, उपजतमृत्यू नोंदी बाबत जनजागृती करुन ग्रामपंचायतीस नोंदी करणेस पाठपुरावा करणे. मोतीबिंदू रुग्ण शोधणे. कुटूंब कल्याण कार्यक्रमांतर्गत जोडप्यांना सल्ला व मार्गदर्शन इत्यादी बाबत दैनंदीन कामकाज करणे. व केलेल्या कामाच्या नोदी नियमित ठेवुन त्याचा अहवाल वैद्यकीय अधिकारी यांना सादर करणे

१५) आरोग्य सेवक स्त्री

प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत प्रसुतपूर्व, प्रसुती अंतर्गत, व प्रसूती पश्चात सेवा देणे. जोखमीचे बांळतपणात मातेस व नवजात अर्भकास आवश्यकते नुसार संदर्भ सेवेसाठी मदत व पाठ पुरावा करणे. नियमित आरोग्य सेवा सत्राद्वारे सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा माता व बालकांना उपलब्ध करुन देणे. शालेय पुर्व मुलांमध्ये कुपोषणाचे रुग्ण शोधून अशा मुलांना पुरक आहार, वैद्यकिय मदत व संदर्भ सेवा देणे. लसीकरण व जीवनसत्व अ च्या मात्रा देणे. कुटूंब कल्याण कार्यक्रमांतर्गत जननक्षम जोडपी सर्वेक्षण करणे. लाभार्थीच्या यादया नुसार पाळणा लांबविणे, पाळणा थांबविणे बाबत सल्ला मार्गदर्शन करुन मतपरीवर्तन करणे. लोक सहभाग घेणे. दायींची यादी करुन प्रसुती बाबत मार्गदर्शन करणे. साथरोगाचे सर्वेक्षण करणे. क्षयरोग, कुष्ठरोग उपचारात सहभाग घेणे. जन्ममृत्यू नोंदी कळविण्यास मदत करणे. या बाबत जागृती करणे. किरकोळ आजारावर प्रथमोपचार करणे. व पुढील उपचारास पाठविणे. सांघीक कार्यात भाग घेणे. वरील सर्व कामाच्या नोंदी ठेवुन अहवाल वैद्यकिय अधिका-यांना सादर करणे. अंगणवाडीला भेट देवून कुपोषीत मुलांचे व मातेच्या आहारा बाबत आरोग्य शिक्षण देणे.

१६) मिश्रक / औषध निर्माण अधिकारी

प्राथमिक आरोग्य केंद्रात बाहय रुग्ण नोंदवहीत रुग्णांच्या नोंदी करुन केस पेपर रुग्णांना देणे. सुचविलेल्या औषधोपचारानुसार गोळया औषधे देणे. दररोज खर्च झालेल्या औषधांच्या नोंदी ठेवणे, साठा नोंदवहया अदयावत करणे. आवश्यक असणारा औषधीसाठा मागणी करणे. औषधांच्या मुदतबाहय तारखेनुसार मांडणी व वापर प्राधान्याने करणे. क्षयरोग, कुष्ठरोग, हिवताप निदाना करीता व उपचारा करीता आवश्यक औषधीसाठा व साहीत्य उपकरणे उपलब्ध करुन घेणे व सहभाग घेणे. सर्पदंश, श्वानदंश या वरील लसी मागविणे, आजार निहाय रुग्णांचे मासीक विविरण करुन नियमित गोषवारा काढणे. बाहयरुग्ण व आंतररुग्ण शुल्काचे रक्कम नियमित पणे चलनाद्वारे बॅकेत भरणे. त्याचा हिशोब ठेवणे. वरील सर्व केलेल्या कामाचे अहवाल वैद्यकीय अधिका-यांना सादर करुन त्यांचे मार्फत वरीष्ठ कार्यालयास पाठविणे. वैद्यकिय अधिका-यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करणे

१७) प्रयोगशाळा तंत्रज्ञ

या संवर्गातील कर्मचा-यांची फक्त आदीवासी व दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेमणुक करण्यात आलेली आहे. प्रयोगशाळा चाचणीद्वारे तातडीने रोगनिदान होवुन वेळीच उपचार करणे सुलभ व्हावे यासाठी खालील कर्तव्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञांनी पार पाडणे आवश्यक आहे.

आलेल्या रक्त, थुकी, लघवी च्या विविध चाचण्या करणे. या बाबतच्या नोंदी ठेवणे. तपासणी साठी आवश्यक असणारी रसायने, उपकरणे साहीत्य सामुग्री मागणी करुन उपलब्ध ठेवणे. चाचण्यांचे निष्कर्ष वेळेत तयार करुन वैद्यकिय अधिका-यांना देणे. केलेल्या कामांचा अहवाल वरिष्ठांना सादर करणे. वैद्यकीय अधिका-यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करणे.

१८) शितयंत्र तंत्रज्ञ

जिल्हा स्तरावरील आरोग्य विभागातील सर्व व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील शितसाखळी उपकरणे, सातत्याने सुस्थितीत कार्यरत राहतील यासाठी वेळोवेळी पाहणी व तपासणी करणे. या बाबत आढावा घेणे आवश्यक तेथे स्वतः भेट देवून दुरुस्ती करणे. व सुधारण घडविणे. उपकरणांची आवश्यकता व उपलब्धता या बाबत सनियंत्रण ठेवणे. उपकरणांमधील तपमानाची नोंदीची माहीती घेणे व शितसाखळी अबाधीत राखणे. केलेल्या कामाच्या नोंदी ठेवुन जिल्हा आरोग्य अधिकारी यांना अहवाल सादर करणे. व त्यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करणे.

१९) कुष्ठरोग तंत्रज्ञ

गृहभेटीद्वारे संशयीत कुष्ठरुग्ण शोधून त्याचे निदान वैद्यकीय अधिका-यांच्या मदतीने करणे व रुग्ण नियमित उपचाराखाली आणने. कुष्ठरोगामुळे व्यंगत्व येवु नये म्हणुन आरोग्य शिक्षणदेणे. संपूर्ण औषधोपचारासाठी प्रवृत्त करणे. कुष्ठरोगा विषयी गैरसमज दूर करणे बहूविध औषधोपचार मोहिमेची अंमलबजावणी करणे, मोहिम राबविणे, वैद्यकीय अधिका-यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करणे.

२०) सफाईगार -

प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत व बाहय परिसराची स्वच्छता करणे. शौचालय, प्रसाधन गृह यांची स्वच्छता दररोज करुन स्वच्छ ठेवणे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील टाकावू निरुपयोगी केरकच-यांची योग्य विल्हेवाट लावणे. वैद्यकीय अधिकारी व परिचारांना सर्व कामात मदत करणे. रुग्णांना संडास व लघवीसाठी भांडे देणे व स्वच्छ करणे.

संस्थेचा प्रारुप तक्ता-










अति.जिल्हा आरोग्य अधिकारी
साथरोग वै.अधिकारी
आरोग्य पर्यवेक्षक -०५
आरोग्य सहाय्यक -०२
आरोग्य कर्मचारी ०३
कनिष्ठ सहाय्यक
वाहन चालक
परिचर ०७


प्रशासन अधिकारी
कक्ष अधिकारी
कार्यालयीन अधीक्षक ०२
सहाय्यक लेखाधिकारी
कनिष्ठ लेखाधिकारी
वरिष्ठ सहाय्यक ०२
कनिष्ठ सहाय्यक ०७
वरिष्ठ सहा.लेखा -०२
कनिष्ठ सहाय्यक लेखा

**(कलम ४(१) (ब) (१))**

**सांगली येथील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सांगली कार्यालयातील कार्य व कर्तव्य यांचा तपशील.**

**कार्यालयाचे नाव** :- जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सांगली.

**पत्ता** :- सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं. ०२३३ २३७३०३२

ई मेल- dhozpsan@gmail.com

**कार्यालय प्रमुख** :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सांगली

**शासकीय विभागाचे नाव** :-सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सांगली.

**कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनिस्त** :-सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई.

**कार्यक्षेत्र** :-सांगली जिल्हा

**भौगोलिक सीमा** :- सांगली जिल्हा

**कार्यानुरूप** :- सांगली जिल्हा

**विशिष्ट कार्य** :- जिल्हा सर्व ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.

**धोरण** :- वरील प्रमाणे

**सर्व संबधित कर्मचारी** :- सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार

**कार्य** :- सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार

**कामाचे विस्तृत स्वरूप** :- सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार

**मालमत्तेचा तपशील** :- सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार इमारत व जागेचा तपशील

**उपलब्ध सेवा** :- सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार

**संस्थेचे संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशील**- सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार

**कार्यालय दूरध्वनी वेळ** :- सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ फोन नं. ०२३३ -२३७३०३२
दुपारी १.३० ते २.०० जेवणाची सुट्टी

**साप्ताहिक सुट्टी** :- सर्व शनिवार व रविवार व सार्वजनिक सुट्ट्या

# जिल्हा परिषद ,सांगली

( कलम २ एच )     ( नमुना - अ )

**शासकीय विभागाचे नांव :- जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद,सांगली**

**कलम - २ (एच) अ /ब /क /ड**

| अ.क्र. | लोक प्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखांचे पदनाम | ठिकाण / पत्ता |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा परिषद ,सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,सांगली | सांगली मिरज रोड, पुष्पराज चौक ,सांगली |

## जिल्हा परिषद , सांगली

(कलम २ (एच) नमुना (ब)

शासकीय विभागाचे नांव :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(कलम २ (एच) (१) (२)

| अ.क्र. | लोक प्राधिकारी विभाग | विभाग प्रमुखांचे पदनाम | ठिकाण/पत्ता |
|---|---|---|---|
| १) | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं .०२३३ - २३७३०३२ ०२३३ - २३७४४६२ ई-मेल- dhozpsan@gmail.com |

## कलम ४(१) (b) (ii) नमुना (अ)

सांगली येथील जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकार्याचा तपशील.

| अ.क्र. | पदनाम | अधिकार अर्धन्यायिक | कोणता कायदा/ नियम/ शासननिर्णय/ परिपत्रक नुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली | लागू नाही | - | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली. यांना अधिकार प्रदान आहे |

## कलम ४(१) (b) (ii) नमुना (अ)

सांगली येथील जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकारांचा तपशील.

| अ.क्र. | पदनाम | अधिकार प्रशासकीय | कोणता कायदा/ नियम/ शासननिर्णय/ परिपत्रक नुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली | प्रशासकीय मंजुरी अधिकार रु.३.००लक्ष पर्यंत | ग्रा.वि.व ज.सं.विभाग मंत्रालय मुंबई झेड पी ओ/१०९९/प्र.क्र.२०८९/भाग-२/३३ सन २०१७ | |
| २ | अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी | निरंक | निरंक | |
| ३ | जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी | निरंक | निरंक | |
| ४ | प्रशासन अधिकारी | निरंक | निरंक | |
| ५ | जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी | निरंक | निरंक | |
| ६ | जिल्हा सांख्यिकी अधिकारी | निरंक | निरंक | |

**कलम ४(१) (b) (ii) नमुना (अ)**

मांगली येथील जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकार्याचा तपशील.

| अ.क्र. | पदनाम | अधिकार फौजदारी | कोणता कायदा/ नियम/ शासननिर्णय/ परिपत्रक नुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली | लागू नाही | - | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली. यांना अधिकार प्रदान आहे |

**कलम ४ (१) (b) (ii) नमुना (ब)**

सांगली, येथील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कर्तव्यांचा तपशील

| अ.क्र. | पदनाम | कर्तव्य –आर्थिक | कोणत्या कायद्या /नियम/शासन निर्णय/परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा आरोग्य अधिकारी | तांत्रिक मंजुरी आर्थिक अधिकार रु. १० लक्ष | ग्रा.वि.व ज.सं. विभाग मंत्रालय मुंबई झेड पी ओ/१०९९/प्र.क्र.२०८९/भाग-२/३३ सन २०१७ | |
| २ | अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी | निरंक | निरंक | |
| ३ | जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी | निरंक | निरंक | |
| ४ | प्रशासन अधिकारी | निरंक | निरंक | |
| ५ | जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी | निरंक | निरंक | |
| ६ | जिल्हा सांख्यिकी अधिकारी | निरंक | निरंक | |

## कलम ४ (१) (ब) (iii)

**निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायित्व निश्चित करून, कार्यपद्धतीचे प्रकाशन**

**( कामाचा प्रकार/नांव ) कामाचे स्वरूप संबधित तरतूद अधिनियमाचे नांव नियम शासन निर्णय**

**परिपत्रके कार्यालयीन आदेश**

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कालावधी | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १) | प्राथमिक आरोग्य केंद्र | ३६५ ते ६०० | कार्यकारी अभियंता इवद/ग्रापापु/छोपावि | शासन निर्णय ग्राविवि क्र .झेडपीए२०००/ प्रक्र४०२३/३३दि .१२/०१/०१अ न्वये रुपये ५० लाखापेक्षाजास्त |
| २) | प्रा.आ.उपकेंद्र बांधकाम | ३६५ ते ६०० | कार्यकारी अभियंता इवद/ग्रापापु/छोपावि | शासन निर्णय ग्राविवि क्र.झेड पीए२०००/प्र.क्र .४३२३/३३ दि.१२/०१/०१ अन्वये रु.५० लाख पेक्षा कमी रक्कमेचे अंदाज पत्रक असल्याने मा.मुकाअ जि.प.मंजुरी देण्यास सक्षम |

कलम ४ (१) (ब) (८) नमुना (अ)

सांगली येथील आरोग्य विभाग सांगली या कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.

| अ.क्र. | समितीचे नाव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दिष्ट | किती वेळा घेण्यात येते | सभा जन सामान्यासाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृतांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य समिती जिल्हा परिषद सांगली | | जिल्हातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सहा राष्ट्रीय कार्यक्रमा अंतर्गत आरोग्य सुविधा व लाभ उपलब्ध करून देणे. | मासिक सभा, सद्या प्रशासक नेमणूक दि.१७/०३/२०२२ | होय | होय |

## कलम ४ (१) (ब) (८) नमुना (ब)

सांगली येथील आरोग्य विभाग सांगली या कार्यालयाच्या अधिसभांची यादी प्रकाशित करणे.

| अ.क्र. | समितीचे नाव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दिष्ट | किती वेळा घेण्यात येते | सभा जन सामान्यासाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृतांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निरंक | | | |

कलम ४ (१) (ब) (८) नमुना (क)

व आरोग्य विभाग सांगली, या कार्यालयाचे परिषदांची यादी प्रकाशित करणे

| अ.क्र. | परिषदेचे नांव | परिषदेचे सदस्य | परिषदेचे उद्दिष्ट | किती वेळा घेणेत येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृतांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निरंक | | | |

सामान्य प्रशासन विभागाशी निगडीत

कलम ४ (१) (ब) (८) नमुना (ड)

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, या कार्यालयाचे कोणत्याही संस्थेची यादी प्रकाशित करणे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | संस्थेचे सदस्य | संस्थेचे उद्दिष्ट | किती वेळा घेणेत येते | सभा जनसामन्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृतांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | निरंक | निरंक | निरंक | | |

**कलम ४(१) (ब) (१६)**

जिल्हा आरोग्य अधिकारी , जिल्हा परिषद , सांगली या कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी / सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी (तेथील लोकप्राधिकारीच्या कार्यक्षेत्रातील) यांची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

क. अपिलीय अधिकारी.

| **अ.क्र.** | **अपिलीय अधिकारीचे नांव** | **पदनाम** | **कार्यक्षेत्र** | **पत्ता/फोन** | **ई-मेल** | **यांच्या अधिनस्त शासकीय माहिती अधिकारी** |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | डॉ. विजयकुमार वाघ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सांगली जिल्हा | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं.०२३३-२३७३०३२ | dhozpsan@gmail.com | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, सांगली |

कलम ४ (१) (ब) (१६)

सांगली येथील जिल्हा आरोग्य अधिकारी , जिल्हा परिषद , सांगली या कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी / सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी ( तेथील लोकप्राधिकारीच्या कार्यक्षेत्रातील ) यांची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

**अ. शासकीय माहिती अधिकारी**

| अ.क्र. | शासकीय माहिती अधिकारीचे नांव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता/फोन | ई-मेल | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्री.सी.बी.पवार | सहाय्यक प्रशासन अधिकारी | सांगली जिल्हा | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं .०२३३ - २३७३०३२ | dhozpsan@gmail.com | डॉ. विजयकुमार वाघ , जिल्हा आरोग्य अधिकारी , जि.प.सांगली |

कलम ४ (१) (ब) (१६)

सांगली येथील जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद ,सांगली या कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी / सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी ( तेथील लोकप्राधिकारीच्या कार्यक्षेत्रातील )यांची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

**ब.सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी.**

| अ.क्र. | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारीचे नांव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता/फोन | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्रीम.एस.बी.लाटे | सहाय्यक लेखाधिकारी | सांगली जिल्हा | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं .०२३३ -२३७३०३२ | dhozpsan@gmail.com |
| २) | श्री.सी.बी.पवार | सहाय्यक प्रशासन अधिकारी | सांगली जिल्हा | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं .०२३३ -२३७३०३२ | dhozpsan@gmail.com |
| ३) | श्री.अफझल मुल्ला | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | सांगली जिल्हा | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं .०२३३ -२३७३०३२ | dhozpsan@gmail.com |
| ४) | श्री.व्ही.ए.पाटील | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | सांगली जिल्हा | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं .०२३३ -२३७३०३२ | dhozpsan@gmail.com |
| ५) | श्री.व्ही.व्ही.पाटील | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | राष्ट्रीय आरोग्य अभियान | सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली. फोन नं .०२३३ -२३७३०३२ | dhozpsan@gmail.com |

## कलम ४ (१) (अ) (६)

सांगली जिल्हा परिषद येथील जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सांगली या कार्यालयामध्ये दस्तएवजांची वर्गवारी.

| अ.क्र. | विषय | दस्ताएवजाचा प्रकार नस्ती/मस्टर नोंदपुस्तक व्हाउचर ई. | प्रमुख बाबीचां तपशीलवार | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | अ वर्ग प्रकरण | रोकड नोंदवही,औषध साठा नोंदवही आवक व जावक टपाल नोंदवही आरोग्य समिती इतिवृत्त नोंदवही | १)शासन निर्णय २)स्थायी आदेश | अमर्याद कालावधी |
| २) | ब वर्ग प्रकरण | शासन नियम व अधिनियम तरतुदीनुसार असलेले अभिलेख. | - | - |
| ३) | क वर्ग प्रकरण | शासन नियम व अधिनियम तरतुदीनुसार असलेले अभिलेख. | - | - |
| ४) | ड वर्ग प्रकरण | किरकोळ रजा संकीर्ण नस्ती | | १ वर्ष |

## कलम ४ (१) (ब) (७)

आरोग्य विभाग सांगली या कार्यालयाच्या परिणामकारक कामासाठी जन सामान्याशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था.

| अ.क्र. | सल्लामसलतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम/परीपात्राकाव्दरे | पुनरावृत्तीकाल |
| --- | --- | --- | --- | --- |
| १) | आरोग्य समितीं | जिल्हातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सहा राष्ट्रीय कार्यक्रमा अंतर्गत आरोग्य सुविधा व लाभ उपलब्ध करून देणे. | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ नियम ७८ नुसार | - |
| २ | प्रा.आ.केंद्र स्तरावर सल्लागार समिती | प्रा.आ.के.कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सहा राष्ट्रीय कार्यक्रमा अंतर्गत आरोग्य सुविधा व लाभ उपलब्ध करून देणे. | | |

कलम 4 (1) (ब) (9)

सांगली जिल्हा परिषद, येथील जिल्हा आरोग्य अधिकारी या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची नांवे, पत्ते व त्यांचे मासिक वेतन देणे

| अ. क्र. | पदनाम | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | वर्ग | रूजू दिनांक | दूरध्वनी क्रं. / फॅक्स / ईमेल | 7 वा वेतन आयोगा मूळ वेतन | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा आरोग्य अधिकारी | डॉ. विजयकुमार गोपीनाथ वाघ | अ | 13/03/2024 | 0233-2373032 zpdhosan@yahoo.co.in | 120900 | छ. संभाजीनगर |
| 2 | अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी | डॉ. मिलिंद धोंडिराम पोरे | अ | 01/08/2017 | ---- ‖ ---- | 114000 | इस्लामपूर |
| 3 | जिल्हा प्रजनन आणि बाल आरोग्य अधिकारी | (प्रभारी) डॉ. विवेक विश्वनाथ पाटील | अ | रिक्त | | | |
| 4 | साथरोग वैद्यकिय अधिकारी | डॉ. उमेश रामचंद्र जुगळे | ब | 01/11/2024 | ---- ‖ ---- | 92700 | इचलकरंजी जि. कोल्हापूर |
| 5 | सांख्यिकी अधिकारी गट-ब | (प्रभारी) डॉ. वैशाली आशुतोष पाटील | ब | रिक्त | | | |
| 6 | जिल्हा विस्तार व माध्यमा अधिकारी | (प्रभारी) श्री. प्रविण लक्ष्मण जाधव | ब | रिक्त | | | |
| 7 | प्रशासकिय अधिकारी (कुक) | (प्रभारी) छोटू भाईदास पवार | ब | रिक्त | | | |
| 8 | विस्तार अधिकारी (आयुर्वेद) | रिक्त | क | रिक्त | | | |
| 9 | सहाय्यक प्रशासन अधिकारी | श्री. छोटू भाईदास पवार | क | 26/08/2019 | ---- ‖ ---- | 58500 | सांगली |
| 10 | सहाय्यक लेखा अधिकारी | श्रीम. सुनीता बाजीराव लाटे | क | 29/08/2024 | ---- ‖ ---- | 38,700 | मिरज |
| 11 | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | श्री. अफजल फिरोज मुल्ला | क | 06/11/2023 | ---- ‖ ---- | 62200 | इस्लामपूर |
| 12 | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | श्री. विश्वासराव आत्माराम पाटील | क | 07/06/2023 | ---- ‖ ---- | 46200 | ढवळे ता. वाळवा |
| 14 | कनिष्ठ लेखा अधिकारी | श्री. प्रविण शिवाजी माने | क | 07/06/2023 | ---- ‖ ---- | 49,000 | मालगांव ता. मिरज |
| 15 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | (प्रभारी) श्री. राजेंद्र गोवर्धन वनसाळे | क | ---- ‖ ---- | | | |
| 16 | औषध निर्माणा अधिकारी | श्री. ओमप्रकाश रामनिवास मालपाणी | क | 01/10/2021 | ---- ‖ ---- | 74300 | सांगली |
| 17 | सांख्यिकी पर्यवेक्षक | श्री. राजेंद्र गोवर्धन वनसाळे | क | 01/03/2023 | ---- ‖ ---- | 67900 | माळशिरस जि. सोलापूर |
| 18 | सार्वजनिक आरोग्य परिचारिका | श्री. आसिफमुस्तफा मेहबूब नदाफ | क | 01/08/2024 | ---- ‖ ---- | 58600 | मिरज |
| 19 | सार्वजनिक आरोग्य परिचारिका | (प्रभारी) श्रीम. ए. ए. परिट | क | रिक्त | | | |
| 20 | अवैद्यकीय पर्यवेक्षक | श्री. अख्तर-उल-इमान शमशुद्दीन पाटील | क | 21/04/1994 | ---- ‖ ---- | 88700 | सांगली |
| 21 | आरोग्य पर्यवेक्षक | श्री. सुखदेव विठ्ठल कोकरे | क | 15/01/1996 | ---- ‖ ---- | 69100 | सांगली |
| 22 | आरोग्य पर्यवेक्षक | श्री. सुमन दिनेश वाघ | क | 07/10/2022 | ---- ‖ ---- | 69100 | कुपवाड ता. मिरज |
| 23 | आरोग्य पर्यवेक्षक | श्री. संजीव रामचंद्र कोळी | क | 08/12/2023 | ---- ‖ ---- | 58600 | हरिपूर ता. मिरज |
| 24 | आरोग्य पर्यवेक्षक | श्री. कुंतिप बाबुराव डुकरे | क | 13/03/2024 | ---- ‖ ---- | 35,400 | कोपरवाडी जि. हिंगोली |
| 25 | आरोग्य पर्यवेक्षक | (प्रभारी) श्री. सुखदेव विठ्ठल कोकरे | क | रिक्त | | | |
| 26 | आरोग्य सहाय्यक | श्री. रमेश कृष्ण जाधव | क | 01/04/2021 | ---- ‖ ---- | 53,600 | बागणी ता. वाळवा |

कलम 4 (1) (ब) (9)

सांगली जिल्हा परिषद, येथील जिल्हा आरोग्य अधिकारी या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची नांवे, पत्ते व त्यांचे मासिक वेतन देणे

| अ. क्र. | पदनाम | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | वर्ग | रूजू दिनांक | दूरध्वनी क्रं. / फॅक्स / ईमेल | 7 वा वेतन आयोगा मूळ वेतन | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 27 | आरोग्य सहाय्यक | श्री. महावीर राजगोंडा उगारे | क | 26/07/2002 | ---- \|\| ---- | 58600 | कळंबी ता. मिरज |
| 28 | आरोग्य सेवक (पुरूष) | श्री. अरुण शिवाजी नादवडेकर | क | 18/09/2021 | ---- \|\| ---- | 53,600 | सांगली |
| 29 | आरोग्य सेवक (पुरूष) | श्री. रुस्तम चांदसाहेब तांबोळी | क | 01/07/2022 | ---- \|\| ---- | 55,200 | सांगली |
| 30 | आरोग्य सेवक (पुरूष) | श्री. सुहास राजेंद्र डोंगरे | क | 01/06/2023 | ---- \|\| ---- | 29600 | सांगली |
| 31 | तंत्रज्ञ | श्री. सुनील गोविंद वडर | क | 08/02/2022 | ---- \|\| ---- | 65100 | गडहिंग्लज जि. कोल्हापूर |
| 32 | सांख्यिकी अन्वेषक | श्री. दिपक राजेंद्र माणगावे | क | 23/04/2021 | ---- \|\| ---- | 27900 | नांद्रे ता. मिरज |
| 33 | जिल्हा समन्वयक | रिक्त | क | रिक्त | | | |
| 34 | चित्रकार नि छायाचित्रकार | रिक्त | क | रिक्त | | | |
| 35 | लघुटकलेखक | रिक्त | क | रिक्त | | | |
| 36 | प्रक्षेपक | रिक्त | क | रिक्त | | | |
| 37 | जिल्हा क्षेत्र अधिकारी / संगणक | रिक्त | क | रिक्त | | | |
| 38 | वरिष्ठ सहाय्यक | श्री. उदय देवप्पा खांडेकर | क | 19/04/2017 | ---- \|\| ---- | 35,300 | जयसिंगपूर जि. कोल्हापूर |
| 39 | वरिष्ठ सहाय्यक | श्रीम. नेहा शिवराज कोरे | क | 19/09/2019 | ---- \|\| ---- | 29,600 | आष्टा ता. वाळवा |
| 40 | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | श्रीम. संगिता लक्ष्मण कोळेकर | क | 07/07/2021 | ---- \|\| ---- | 39,900 | सांगली |
| 41 | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | श्री. संदिप आनंदा अडसुळे | क | 30/12/2023 | ---- \|\| ---- | 29,600 | सांगली |
| 42 | कनिष्ठ सहाय्यक | श्री. संजय आण्णाप्पा बेरड | क | 10/08/2021 | ---- \|\| ---- | 35,300 | म्हैशाळ ता. मिरज |
| 43 | कनिष्ठ सहाय्यक | श्री. रणजित विनायक कांबळे | क | 01/06/2021 | ---- \|\| ---- | 35,300 | सांगली |
| 44 | कनिष्ठ सहाय्यक | श्री. शंकर चन्नाप्पा कोळी | क | 01/06/2021 | ---- \|\| ---- | 34,000 | डिग्रज ता.मिरज |
| 45 | कनिष्ठ सहाय्यक | श्री. इरफान रसूल तांबोळी | क | 11/09/2013 | ---- \|\| ---- | 29,600 | सांगली |
| 46 | कनिष्ठ सहाय्यक | श्री. राकेश दत्तात्रय हंबर | क | 01/06/2021 | ---- \|\| ---- | 26,000 | सांगली |
| 47 | कनिष्ठ सहाय्यक | श्री. भिकू मोहन सोनावळे | क | 28/08/2024 | ---- \|\| ---- | 20,300 | पलूस |
| 48 | कनिष्ठ सहाय्यक | श्री. पांडूरंग सर्जेराव पवार | क | 13/10/2024 | ---- \|\| ---- | 19,700 | सांगली |
| 49 | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | रिक्त | क | रिक्त | | | |
| 50 | वाहन चालक | श्री. शंकर पांडुरंग भोसले | क | 01/07/2009 | ---- \|\| ---- | 37,200 | मिरज |
| 51 | वाहन चालक | श्री. भारत हुसेन आलासकर | क | 04/07/2019 | ---- \|\| ---- | 28,400 | आलास जि. कोल्हापूर |

कलम 4 (1) (ब) (9)

सांगली जिल्हा परिषद, येथील जिल्हा आरोग्य अधिकारी या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची नांवे, पत्ते व त्यांचे मासिक वेतन देणे.

| अ. क्रं | पदनाम | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | वर्ग | रूजू दिनांक | दूरध्वनी क्रं. / फॅक्स / ईमेल | 7 वा वेतन आयोगा मूळ वेतन | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 52 | वाहन चालक | श्री. बाळासाहेब यशवंत हजारे | क | 01/01/2016 | ---- \|\| ---- | 43,500 | कुमठे ता. तासगांव |
| 53 | वाहन चालक | श्री. अविनाश राजाराम गायकवाड | क | 04/07/2019 | ---- \|\| ---- | 28,400 | सांगली |
| 54 | वाहन चालक | श्री. मोहन रामचंद्र गोसराडे | क | 28/04/2022 | ---- \|\| ---- | 42,200 | मिरज |
| 55 | वाहन चालक | श्री. साजिद वजीर करोली | क | 08/12/2023 | ---- \|\| ---- | 37,200 | सांगली |
| 56 | परिचर | श्री. कुमार पांडुरंग माळी | ड | 01/06/2017 | ---- \|\| ---- | 37,600 | कवलापूर ता. मिरज |
| 57 | परिचर | श्री. दत्तात्रय ज्ञानू पवार | ड | 17/07/2022 | ---- \|\| ---- | 37,600 | सांगली |
| 58 | परिचर | श्रीम. वृंदा विनायक पिसे | ड | 01/12/2016 | ---- \|\| ---- | 19,700 | मिरज |
| 59 | परिचर | श्रीम. शायराबी दिलावर शिकलगार | ड | 11/06/2014 | ---- \|\| ---- | 38,700 | बुधगांव ता. मिरज |
| 60 | परिचर | श्रीम. वर्षा दिनाकर बनसोडे | ड | 12/06/2007 | ---- \|\| ---- | 38,700 | माधवनगर ता. मिरज |
| 61 | परिचर | श्री. महेश गणपतराव जाधव | ड | 31/05/2008 | ---- \|\| ---- | 29,000 | सांगली |
| 62 | परिचर | श्रीम. स्मिता सुनील महामुनी | ड | 07/12/2007 | ---- \|\| ---- | 25,800 | सांगली |

# कुटूंब नियोजन नुकसान भरपाई योजना

कुटूंब नियोजन नुकसान भरपाई योजना दिनांक 01/04/2013 पासून सुरु झालेली आहे. या **योजनेचा मुख्य उद्देश्य** कुटूंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर उद्भवणाऱ्या असफलता , गुंतागुंत व मृत्यू प्रकरणी लाभार्थीस नुकसान भरपाई देणे व कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर्स व आरोग्य संस्था यांना इन्डेमिटी कव्हर (Indemnity Cover) असा आहे.

1) रुग्णालयात कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर मृत्यू झाल्यास (Inclusive of Death During process of sterilization operation) किंवा रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर सात दिवसाच्या आत मृत्यू झाल्यास रक्कम रुपये 2,00,000/- इतका लाभ दिला जातो.
2) कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्याच्या तारखेपासून 8 ते 30 दिवसांच्या दरम्यान मृत्यू झाल्यास रक्कम रुपये 50,000/- इतका लाभ दिला जातो.
3) कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया असफल (Failure) झाल्यास रक्कम रुपये 30,000/- इतका लाभ दिला जातो.
4) कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करतेवेळी गुंतागुंत झालेस (Inclusive of complication during process of sterilization operation) किंवा कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्यावर डिस्चार्ज दिल्यानंतर 60 दिवसाच्या कालावधीत गुंतागुंत (Complications) झाल्यास प्रत्यक्ष खर्च परंतु 25,000/- च्या मर्यादेत इतका लाभ देणेत येतो.
5) कुटूंब नियोजन सेवा पुरविणारे डॉक्टर आणि शासकिय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था, ऍक्रिडेट केलेली खाजगी रुग्णालये यांचेसाठी इन्डेमिटी (Indemnity) प्रती डॉक्टर / संस्था प्रती वर्ष 4 प्रकरणांच्या मर्यादेत रुपये 2,00,000/- प्रती प्रकरणाच्या मर्यादेत लाभ दिला जातो.

**आवश्यक कागदपत्रे**

अ) **कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर मृत्यु** –

